# नियमित दिवाणी दावा क्र.२१८/२०१४

आप्पासाहेब विरुध्द बाबासो

## अर्ज निशाणी क्र.१३ वरील आदेश

प्रस्तुतचा दावा हक्कज्ञापनासाठी व कायमस्वरुपी मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल करण्यात आला आहे.

२. प्रस्तुतचा अर्ज; वादींनी दे.भ. रत्नाप्पाण्णा कुंभार पंचगंगा सहकारी साखर कारखाना लि. गंगानगर इचलकरंजी जि. कोल्हापूर यांनी वादग्रस्त मिळकतीतून आलेल्या ऊस बीलाची रक्कम भूपाल कल्लाप्पा कांबळे यास अदा करु नये असा हुकूम होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. अर्जातील वादींचे थोडक्यात असे कथन आहे की, वादग्रस्त मिळकतीशी प्रतिवादीचा कसलाही व कोणताही हक्कहितसंबंध नव्हता व नाही. अशी वस्तुस्थिती असताना; सदर मिळकतीबाबत कुरुंदवाड येथील दिवाणी न्यायालयात नियमित दिवाणी दावा क्र. १६४/२०१४ हा कायमस्वरुपी मनाई हुकूम मिळणेसाठी दावा व जयसिंगपूर येथील मा. दिवाणी वरीष्ठ न्यायालयात नियमित दिवाणी दावा क्र.२०१/२०१५ हादेखील कायमस्वरुपी मनाई हुकूम मिळणेसाठी दावा दाखल करण्यात आलेला आहे. सदरील दावे अदयाप प्रलंबित आहेत. प्रतिवादीस तहसिलदार यांचेतर्फे संबंधित अधिका–यांनी वादग्रस्त मिळकतीचा कधीही व केव्हाही कब्जेपट्टी पंचनामा करुन दिलेला नव्हता व नाही. अशी वस्तुस्थिती असताना; रविकांत कारदगे, संतोष कारदगे, सुनिल कारदगे तिघेही रा. राजापूर, ता. शिरोळ व शाहीन शाहजान तहसीलदार यांना वादग्रस्त मिळकतीतील क्षेत्र प्रतिवादीने दिनांक ५.१.२०१६ रोजी खरेदी दिलेले असून, त्यांचे मदतीने सदर मिळकतीतील ऊस बील न्यायालयाच्या हुकूमाने जप्त होवू नये या उद्देशाने प्रतिवादीने संगनमताने भुपाल कल्लाप्पा कांबळे रा. अकिवाट याच्या नावे दिनांक १८.०१.२०१६ रोजीपासून दे.भ. रत्नाप्पाण्णा कुंभार पंचगंगा सहकारी साखर कारखाना लि. गंगानगर, इचलकरंजी जि. कोल्हापूर (यापुढे सोयीकरीता सदर कारखान्यास 'कारखाना ' असे संबोधिण्यात येते.) या कारखान्यास पाठवून दिलेले आहे. भूपाल याचा सदर मिळकतीतील ऊस पीकाशी कोणताही व कसलाही संबंध नाही. भूपाल हा वादग्रस्त मिळकतीशी मालक अथवा भोगवटादार अथवा इतर हक्कात कुळ म्हणून संबंधित नाही. भूपाल याने मनुष्यबळाच्या व पैशाच्या जोरावर वादग्रस्त मिळकतीतील ऊस स्वतःच्या नावे कारखान्यास पाठवून दिलेला आहे. वास्तविक; सदर दावा दाखल केलेची सूचना प्रतिवादीस मिळाल्यामुळे भूपाल याच्या नावे ऊस पाठवून देण्यात आलेला

आहे. त्या ऊस बीलाची रक्कम कारखान्याने भूपाल कल्लाप्पा कांबळे यास अदा करु नये अशी प्रतिबंधात्मक यादी कारखान्यास दयावी. ऊस बीलाची रक्कम नि.५ वरील अर्जाच्या निकालापावेतो वादी घेणार नाही. इत्यादी सर्व बाबी नमूद करुन अर्ज मंजूर करण्याची विनंती वादींनी केली आहे.

३. प्रतिवादीने प्रस्तुत अर्जावर संधी मिळूनही आपले म्हणणे सादर केले नाही. त्यामुळे आज रोजी प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीच्या म्हणण्याशिवाय चालविण्यात येत आहे. त्रयस्थ इसम भूपाल कल्लाप्पा कांबळे याचे म्हणणे मागविले असता; ते त्याने नि.१७ वर सादर केले आहे. त्याचे थोडक्यात असे म्हणणे आहे की, अजातील सर्व कथने खोटी व चुकीची आहेत. सदरील इसम हा दाव्याचे कामी पक्षकार म्हणून सामील करण्यात आलेला नाही. त्यामुळे त्याचेविरुध्द वादींना कोणतीही दाद कायदयाने मागता येणार नाही. सन २०११ सालापासून दोन एकरातील ऊस भूपाल याच्या नावावर ठरल्याप्रमाणे जातो. यावर्षी सदरील जमीनीमध्ये भूपाल याने ऊस पिकवून तो ऊस कारखान्यास जर्नादन शिवाप्पा कांबळे याच्या संम्मतीने पाठविलेला आहे. त्या ऊस बीलाशी वादींचा काहीही संबंध नाही. वादग्रस्त जमीनीच्या मालकीवहिवाटीशी वादींचा काहीएक संबंध राहिलेला नाही. वादी हे खोडसाळपणाने गट क्र.९८७ क्षेत्र हे ३.४ आर या उत्तर बाजूच्या जमीनीबद्दल व वहिवाटीबद्दल खोटयानाटया तक्रारी करीत आहेत. खरी वस्तुस्थिती वादींनी समोर आणलेली नाही. अर्ज अप्रामाणिकपणाचा व खोडसाळपणाचा असून, तो सकृतदर्शनी रद्द होण्यास पात्र आहे. केवळ भूपाल यास त्रास देण्यासाठी सदरील अर्ज दाखल करण्यात आला आहे. अर्ज नामंजूर करण्याने वादींचे काहीही नुकसान होणार नाही. परंतु, अर्ज मंजूर केल्यास, भूपाल याचे न भरुन येणारे नुकसान होणार आहे . त्यामुळे अर्ज फेटाळण्यात यावा . इत्यादी सर्व बाबी नमूद करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती भूपाल याने केली आहे.

४. वादींतर्फे सुविद्य विधीज्ञ श्री. बी. आर. कुंभार आणि त्रयस्थ इसम भूपाल कल्लाप्पा कांबळे रा. अकिवाट याच्यातर्फे सुविद्य विधीज्ञ श्री. व्ही. एस. सुतार यांनी केलेला संपुर्ण युक्तीवाद ऐकला. त्रयस्थ इसम याच्यातर्फे सादर झालेल्या माधवजी विरुध्द जय लक्ष्मी ,२००७(५) एमएचएलजे ७९७ या न्यायनिवाडयातील मार्गदर्शक तत्वांचे अवलोकन केले. त्यातील वादतथ्ये आणि प्रस्तुत कामातील वादतथ्ये ही वेगवेगळी असल्याने त्यातील मार्गदर्शक तत्वे प्रस्तुतकामी तंतोतंत लागू होत नाहीत. वाद-प्रतिवाद कथनांचे अवलोकन केले. नि.१८ वरील साक्षीदाराच्या शपथपत्राचे व अभिलेखावरील सकृतदर्शनी कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले. वादींनी प्रतिवादीविरुध्द वादग्रस्त मिळकतीसंदर्भात सखाराम धोंडी पाटील याने दिनांक

३.१२.१९५६ रोजी नोंदणीकृत दस्त क्र.१२९६ अन्वये केलेल्या पोटगीपत्राने ताराबाई भ्र. गणपतराव पाटील व आक्काताई भ्र.तात्यासो पाटील या मालक झालेल्या नाहीत; वादग्रस्त मिळकतीसंदर्भात वर नमूद आक्काताई हिच्या नावे नोंदणीकृत दस्त क्र.२१२२ अन्वये दिनांक १९.६.१९७९ रोजी केलेले मृत्यूपत्र चुकीचे व बेकायदेशीर आहे असे हक्कज्ञापन होवून मिळणेसाठी आणि वादींच्या सदर मिळकतीतील तथाकथित कब्जेवहिवाटीस प्रतिवादीने स्वतः अगर इतरामार्फत हरकत अथवा अडथळा करु नये; असा कायमस्वरुपी मनाई हुकूम मिळणेसाठी प्रस्तुतचा दावा दाखल करण्यात आला आहे. प्रतिवादीने नि.१२ वर त्याची कैफियत दाखल करुन वादग्रस्त मिळकतीत त्याचा सन २००३ पासून अखंड व अव्याहतपणे शांततामय ताबा असल्याचे प्रतिवादकथन सादर केलेले आहे. एकुणच वादकथने प्रतिवादीने फेटाळून लावली आहेत. अभिलेख पाहता; वादींनी प्रतिवादीविरुध्द मागितलेली तूर्तातूर्त मनाई हुकूम मिळणेची विनंती दिनांक २९.८.२०१५ रोजीच्या आदेशान्वये नामंजूर करण्यात आलेली आहे असे दिसते.

५. अभिलेखावरील ही बाब खरी आहे की, त्रयस्थ इसम भूपाल कांबळे अथवा कारखाना हे याकामी आवश्यक पक्षकार नाहीत. संपूर्ण अर्जामधील वादींची कथने पाहता; वादग्रस्त मिळकतीमधील ऊसाचे पीक वादींनी केलेले आहे, ऊस पिकाच्या लागवडीसाठी येणारा खर्च हा वादींनी स्वतः अदा केला आहे अशी त्यांची कोठेही कथने नमूद नाहीत असे स्पष्ट दिसून येते. शिवाय; अभिलेखावरील वादग्रस्त मिळकतीच्या ७/१२ उता-याचे अवलोकन केले असता; मिळकतीच्या सन २०१२-२०१३ या कालावधीत 'भोगवटादाराचे नाव ' अथवा 'जमीन करणा-याचे नाव ' या सदरी वादींच्या नावाची नोंद असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत नाही. किंबहुना सदर मिळकतीच्या ' इतर अधिकार ' या सदरी सा.कु. या सदरी वादींच्या नावाभोवती कंस करण्यात आला असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. शिवाय; वादींनी प्रस्तुतकामी नवीन वादकारण अर्जामध्ये त्रयस्थ इसम भूपाल कांबळे याच्याविरुध्द नमूद केलेले असून, कारखान्याने सदर इसमाच्या हक्कात ऊस बील अदा करु नये असा अंतरिम आज्ञार्थी मनाई हुकूम मिळणेची मागणी केलेली आहे. अर्जातील कथनांचे पुष्टयर्थ वादींनी सकृतदर्शनी कागदोपत्री पुरावा हजर केलेला नाही. तथापि; प्रस्तुतचा दावा हा कायमस्वरुपी मनाई हुकूम मिळणेसाठी आणि हक्कज्ञापन होवून मिळणेसाठी दाखल करण्यात आला असल्याने; वादग्रस्त मिळकतीत वादींचा दावा दाखल तारखेस कब्जा आहे काय, त्या कब्जास प्रतिवादीने हरकत केली आहे काय, वादी हे प्रतिवादीविरुध्द कायमस्वरुपी मनाई हुकूम मिळणेची आणि हक्कज्ञापन होवून मिळणेची मागणी मंजूर होवून मिळणेस पात्र ठरतात काय हे मुद्दे सबळ पुराव्यानिशी वादींनी शाबीत करणे जरुरीचे आहे. सकृतदर्शनी वादींचा वादग्रस्त मिळकतीत

ताबा असल्याचे त्यांनी सिध्द केलेले नाही या निष्कर्षापर्यंत न्यायालय नि.५ वरील अर्जाची अंतिम निर्गती करीत असताना पोहोचलेले आहे. अर्जातील संपूर्ण कथने पाहता; वादग्रस्त मिळकतीतील ऊसाचे पीक आणि त्यासंदर्भातील बील हे दाव्याचा वादविषय नाही असे दिसून आलेले आहे. अर्जात मागणी केल्याप्रमाणे अंतरिम आज्ञार्थी मनाई हुकूम त्रयस्थ इसमाविरुध्द न्यायालयास मुळीच देता येणार नाही. अर्ज नामंजूर करण्याने वादींचे कसलेही नुकसान होणार नाही. तथापि; अर्ज मंजूर करण्यात आल्यास, दाव्यातील वादातीत विषय सोडून प्रकरणाशी संबंधित नसलेल्या मुद्दयाचा निष्कर्ष काढल्यासारखे होणार आहे. अर्ज मंजूर करण्याने भूपाल कांबळे याचे नुकसान होणार असल्याचे सकृतदर्शनी दिसते. अर्जामध्ये आजच्या स्थितीस सकृतदर्शनी पुराव्याअभावी कोणतेही तथ्य आढळत नसलेने अर्ज नामंजूर करावा लागेल. करीता खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. सदरील आदेश दे.भ. रत्नाप्पाण्णा कुंभार पंचगंगा सहकारी साखर कारखाना लि. गंगानगर, इचलकरंजी, जि. कोल्हापूर यांना कळविण्यात यावा.
(आदेश खुल्या न्यायालयात घोषित केला. )

सही /-

दिनांक १८ एप्रिल, २०१६

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
कुरुंदवाड.

I affirm that the contents of this P. D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | S.K.Yadav, Stenographer (L.G.) |
| Name of the Court | Civil Court Jr. Dn., Kurundwad. |
| Date of Dictation | 18.04.2016 |
| Order signed by the P. O. on | 18.04.2016 |
| Order uploaded on | 22.04.2016 |